महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र. १३१/प्रनिप्रा/१२६१ दिनांक : 01 JUN 2022

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, **दिनांक १२ मे, २०२२ रोजी दुपारी १२:०० वा. व ०३:०० वा.** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक ५९ व्या बैठकीचे इतिवृत्त,-

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, ३) श्री. विश्वजीत व. माने (भा.प्र.से.) सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, ४) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा., ५) डॉ. के.डी. चव्हाण, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, ६) डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा, व ७) श्री. रविंद्र जगताप (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य काही कारणास्तव बैठकीस गैरहजर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

१) डॉ. सुभाष महाजन, अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई तथा परीक्षा समन्वयक, तंत्र शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई व २) डॉ. बी. एन. हिवाळे, विशेष कार्य अधिकारी, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व ३) डॉ. एस.जी. गिरबिडे, परिक्षा समन्वयक, आयुष / वैद्यकीय शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकींचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

**विषय क्रमांक १: खालील नमूद तपशीलाप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.**

| अ. क्र. | बैठकीचे वेळापत्रक | | विभाग | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|---|
| | दिनांक | वेळ | | |
| १) | १२/०५/२०२२ | दुपारी १२:०० वा. | वैद्यकीय शिक्षण | पी.जी.ओ. व बी.पी.ओ. |
| | | दुपारी ०३:०० वा. | | बी.ए.एस.एल.पी. व बी.ओ.टी.एच. |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक बैठक-१८२२/प्र.क्र.१०३/प्रनिप्रा/४६४, दिनांक १७/०२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रवेश नियामक प्राधिकरणाची ५९ क्रमांकाची बैठक गुरुवार दिनांक १२ मे २०२२ रोजी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पी.जी.ओ., बी.पी.ओ., बी.ए.एस.एल.पी. व बी.ओ.टी.एच. या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी आयोजित करण्यात आलेली आहे.

या संदर्भात संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे क्रमांक संवैशिवसं/शै.व. २०२१-२२/पदवी-पदव्युत्तर पडताळणी/२०२२, दिनांक ०९/०५/२०२२ रोजीच्या पत्राद्वारे केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पी.जी.ओ., बी.पी.ओ., बी.ए.एस.एल.पी. व बी.ओ.टी.एच. या अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी आयोजित केलेली क्रमांक ५९वी बैठक दिनांक १६/०६/२०२२ रोजी घेण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

संबंधित महाविद्यालयांच्या प्रवेश मान्यतेबाबत प्रवेश मान्यता प्रस्ताव महाविद्यालयांमार्फत प्राधिकरणास प्राप्त झाल्यानंतर तसेच प्राधिकरण स्तरावर १% प्रवेशांची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर प्रवेश मान्यतेबाबत निर्णय घेण्यात येईल.

**विषय क्रमांक २ : मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

(क) शांताराम पोटदुखे विधी महाविद्यालय, चंद्रपुर येथील शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील व्यावसायिक विधी-३ वर्ष अभ्यासक्रमास प्रवेशित कु. शितल रविंद्र दुर्गे यांच्या प्रवेश मान्तयेबाबत.

शांताराम पोटदुखे विधी महाविद्यालय, चंद्रपुर येथील शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील व्यावसायिक विधी-३ वर्ष अभ्यासक्रमास प्रवेशित कु. शितल रविंद्र दुर्गे यांनी तात्पुरते जागा वाटप पत्र (Provisional Allotment Letter) उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांना सादर केले नव्हते व त्या कारणास्तव सदरील विद्यार्थीनी कोणत्या प्रवर्गातून प्रवेशित आहे ही बाब स्पष्ट नव्हती, तथापि या संदर्भात महाविद्यालयास विचारणा केली असता महाविद्यालयाने सदरील प्रवेश एस.ई.बी.सी. संवर्गातून झाला आहे, अशी चूकीची माहिती सर्व संबंधीतांना अवगत केली.

प्रस्तूत प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २०/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सीईटी कक्ष व संबंधीत महाविद्यालय यांना अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले व तद्नुषंगाने उच्च शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी दिनांक १०/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये अहवाल सादर केलेला आहे.

उक्त वस्तूस्थिती विचारात घेता परिक्षा समन्वयक, उच्च शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी दिनांक १०/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या अहवालास अनुसरुन शांताराम पोटदुखे विधी महाविद्यालय, चंद्रपुर येथील शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील व्यावसायिक विधी-३ वर्ष अभ्यासक्रमास प्रवेशित कु. शितल रविंद्र दुर्गे यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तथापि सदरील प्रकरणी महाविद्यालयाने केलेल्या गैरप्रकाराबाबत संबंधीत महाविद्यालयास रु. १ लाख दंडाची रक्कम भरण्याच्या अटीवर सदरील मान्यता देण्यात येत आहे, तसेच या प्रवेशाबाबत

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,

महाविद्यालय अथवा विद्यार्थी यांनी मागासवर्गीय संवर्गातील प्रवेश प्रकरणी शिष्यवृत्तीचे कोणतेही लाभ घेतलेले नाही, असे शपथपत्र प्राधिकरणास सादर करणे बंधनकारक राहील. याची कृपया नोंद घ्यावी.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 01 JUN 2022